# श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे–४११ ००९
# केंद्र शासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत
# अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट–मॅट्रिक शिष्यवृत्ती
# सूचना

## दि. १६/०९/२०२१

विकलांगजन सशक्तीकरण विभागामार्फत अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट–मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सदर अपंग विद्यार्थी आर्थिक सहाय्य पोस्ट–मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१–२२ साठी राज्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने कार्यान्वित करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.

**योजनेच्या प्रमुख अटी:–**

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.
२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४०% व त्यापुढील असावी.
३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपंड लाभार्थी नसावा.
५. अर्जदाराच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/– इतकी आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन अपंग अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल. विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडणे आवश्यक आहे.
७. इयत्ता १० वी व १२ वी ची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठातून दिलेला विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र असेल.
८. शिष्यवृत्तीची रक्कम ही विकलांगजन सशक्तीकरण विभाग, नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते.

**अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे:–**

१) विद्यार्थ्याचा फोटो
२) मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायाप्रत
३) पालकाचे तहसिलदार यांच्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र
४) महाविद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती
५) बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायाप्रत
६) विद्यार्थ्याचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र (राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.)
७) महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र
८) आधार कार्ड छायाप्रत

**सदर ऑनलाईन अर्ज भरल्याची प्रत आवश्यक त्या स्व-साक्षांकित कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावा.**

**प्राचार्य**